# श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ

जा.क्र.श्रीवनाशावैमय/मध्यभांडार/दरपत्रक/ २०७९३ /२०१८ दि.१२/११/२०१८

## जाहिर दरपत्रक सुचना

श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, यवतमाळ या संस्थेकरिता लायब्ररी स्टडी टेबल व खुर्च्या खरेदीबाबत इच्छुक पुरवठादाराकडुन दरपत्रक मागविण्यांत येत आहेत.

सदर दरपत्रक व्दि-लिफाफा पध्दतीने दरपत्रके मागविण्यात येत आहे. प्रथम लिफाप्यामध्ये मागणी केलेली दस्तऐवज क्रमाने लावण्यात यावी. तर दुसऱ्या लिफाप्यामध्ये दरपत्रकाच्या तपशीलाप्रमाणे क्रमाने दर नमुद करावे,मोहोरबंद दरपत्रके सादर करण्याची अंतिम तारीख १८/११/२०१८ दुपारी ५.०० वाजेपर्यत असुन दि २०/११/२०१८ दुपारी ३.३० ......वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात दरपत्रके उघडण्यात यईल. इच्छुक निविदाधारक/प्रतिनिधी सदर सभेस उपस्थित राहता येईल. दरपत्रक अधिष्ठाता, श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, यवतमाळ यांचे नांवे सादर करावयाचे असुन दरपत्रकाच्या लिफाप्यावर " लायब्ररी स्टडी टेबल **चे दरपत्रक** " तसेच दर हे निविदाधारकाने लेटरहेडवर सोबत जोडलेल्या तपशीलाप्रमाणे त्याच क्रमाने देण्यात यावा. **लिफाफा क्र.१ व २ वेगवेगळे मोहोदबंद करुन ते एका मोठया लिफाफामध्ये मोहोरबंद करुन लिफाप्यावर " लायब्ररी स्टडी टेबल व खुर्च्या चे दरपत्रक " लिहिण्यात यावे. अन्यथा आपले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.**

**लिफाफा क्र.१ (आवश्यक दस्तऐवज)**

१. दुकान नोदंणी प्रमाणपत्र/उद्योग आधार नोंदणी
२. पॅन कार्ड
३. जीएसटी प्रमाणपत्र
४. शासकीय/निम्न शासकीय विभागाकरिता पुरवठा केलेला असल्याबाबतची यादी
५. सोबत दिलेला कम्प्लायन्स चार्ट

| Sr. No. | Specification | Yes/No |
|---|---|---|
| 01 | **Library Study Table**<br>Library study table size 16' x 4' with 2" x 2" square pipe 14 Gauge steel black paint structure, Top 18 m.m. Plywood with Mica Laminated & Border 35 m.m | |
| 02 | **Library Study Chair**<br>Non Revolving in Capsul Pipe<br>Handle with soft Arms & Cution Seat and Back | |

लिफाफा क्र.२ (किंमतीचा)

| Sr. No. | Name of Item | Rate Inclusive all Taxes (1 Nos) |
|---|---|---|
| 01 | **Library Study Table**<br>Library study table size 16' x 4' with 2" x 2" square pipe 14 Gauge steel black paint structure, Top 18 m.m. Plywood with Mica Laminated & Border 35 m.m | |
| 02 | **Library Study Chair**<br>Non Revolving in Capsul Pipe<br>Handle with soft Arms & Cution Seat and Back | |

सर्व दर हे एका नगाकरीता मागण्यात येत असून त्यामध्ये सर्व कर व वाहतूक खर्च नमुद करणे आवश्यक आहे. अपुर्ण माहीतीसह प्राप्त होणारी दरपत्रके नाकारण्याचा अधिकार मा.अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे. तसेच मागविण्यात येणारी बाब किंवा मागविण्यात येणा-या संपुर्ण दरपत्रकाची प्रक्रिया रदद करण्याचा अधिकार मा.अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे. दरनिश्चिती व सदर बाबीचे सॅम्पल मान्यता प्रदान करण्यात आल्यानंतर खरेदी आदेश देण्यात येईल. पुरवठा आदेश प्राप्त होताच ४५ दिवसाच्या आत मालाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. अन्यथा विलंब केल्यास विलंब कालावधी करिता एकुण रक्कमेवर ०.५ टक्के प्रती आठवडा या प्रमाणे विलंब शुल्क आकारण्यात येईल.

**न्युनतम दरधारकास प्रथम सॅम्प्ल सादर करणे अनिवार्य आहे. खरेदी समितीकडून सॅम्पल मान्य करण्यात आल्यानंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात येईल.** जर दोन प्रकारचे सॅम्पल सादर करावयाचे असल्यास पुरवठादाराने त्या करीता दोन स्वतंत्र दरपत्रके वेगवेगळे लिफाफयात सादर करावे. दोन पेक्षा अधिक दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.

सदर दरपत्रका संबंधी आपणास काही तक्रार या कार्यालयास दाखल करावयाची असल्यास प्रथम आपणास या कार्यालयात तक्रारी संबंधी रु.१०,०००/- शासनखाती जमा करावे लागेल. जर आपण दाखल केलेल्या तक्रारीत या कार्यालयास काही तथ्य आढळून आल्यास आपणास आपण शासन खाती जमा केलेली रु.१०,०००/- रक्कम परत करण्यात येईल. जर तक्रार खोटी आढळल्यास रु.१०,०००/- रक्कम परत करण्यात येणार नाही

अधिष्ठाता,
श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकिय महाविद्यालय,
यवतमाळ